आर.सी.सी. ८४/२०२३
सरकार वि. सिताबाई व इतर
**निशाणी २६**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. १ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,**

| | |
|---|---|
| माझे नाव – गौरी विशाल काळे, | वय – ३२ वर्षे, |
| व्यवसाय – शेती, | राहणार – बहिरवाडी, |
| तालुका – अकोले, | जिल्हा – अहमदनगर. |

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. घटना अंदाजे २ वर्षापुर्वी सकाळी १२:३० वाजता बहिरवाडी येथे आमच्या घरी घडली होती. त्यावेळी माझ्यामध्ये व आरोपींमध्ये किरकोळ वादावादी झाली होती. या व्यतिरीक्त काही घडले नव्हते. रागाच्या भरात मी आरोपींविरूध्द फिर्याद दिली होती. फिर्यादीमध्ये मी उपरोक्त मजकुराव्यतिरीक्त काही सांगितले नव्हते. आता मला अभिलेखावरील माझी फिर्याद व छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. सहीस अनुक्रमे **निशाणी २७ व २८** देण्यात येते.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २९.११.२०२२ रोजी माझा

मोठा मुलगा वेदांत हा आजारी असल्याने मी त्याला सरकारी दवाखान्यातून उपचार घेवून दुपारी ०१:५० वाजता बहिरवाडी येथे घरी गेले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे सासु–सासरे व पती यांनी मला शिवीगाळ, दमदाटी केली व तु आमच्या पासून वेगळी का राहते असे म्हणून मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्यामध्ये व माझ्या पतीमध्ये झटापट होवून त्यामध्ये माझ्या मानेला दुखापत झाली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने लाकडी काठीने माझ्या पाठीवर, पोटावर मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सासुने मला हाताच्या चापटीने मारहाण केली व गळ्यातील सोन्याची पोत व कानातील तोडून नुकसान केले. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा मुलगा यांनी आरडाओरडा केला असता त्यांनी आम्हाला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली व निघून गेले. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनेबाबत मी माझा भाऊ सचीन भांगरे यास फोन करून सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनेबाबत मी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती.

३. आता मला माझ्या फिर्यादीमधील अधोरेखांकित भाग 'अ' मधील मजकुर वाचुन दाखवण्यात आला. तो मी पोलिसांना सांगितला नव्हता. पोलिसांनी तो माझ्या फिर्यादीमध्ये का नमुद केला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मजकूर मी पोलीसांना सांगितला होता व तो पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे नमूद केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यामध्ये तडजोड झाली असल्यामुळे व आरोपींना शिक्षा होऊ नये म्हणुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

आर.सी.सी. ८४/२०२३
सरकार वि. सिताबाई व इतर
**निशाणी २६**

**उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. ए. के. धुमाळ यांच्या मार्फत**

उलटतपास नाकारला.
फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.02.11 18:15:11 +0530

दिनांक ११.०२.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट नं. २, अकोले.